ॲड.श्री.बी.एच. मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात कामकाज पाहिल्याबाबत त्यांना फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र १०१६/प्र.क्र.१२ /पोल-१०

२ रा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजुगुरु चौक
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०१९.

<u>वाचा-</u> १) समक्रमांकाचा शासन निर्णय, दिनांक ०५.१०.२०१७
२) पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/३०/वकील फी/ ॲड मार्लापल्ली/१६७/२०१७, दि.१६.०२.२०१८, दि.२४.०१.२०१९ व दि.०८.०३.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ॲड मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात कामकाज पाहिल्याबद्दल रु. ५,६०,०००/- इतकी व्यावसायिक फी मंजूर करण्यात आली होती. सदर संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय रद्द करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमीत करण्याबाबत संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये विनंती केली आहे.

गृह विभाग, मंत्रालय (खुद्द) येथील विशा-३(अ) कार्यासनाकडील (१) सुभाष पोपटलाल दवे विरुध्द युनियन ऑफ इंडिया आणि इतर व (२) माया अजित साटम विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर, या मा.सर्वोच्च न्यायालयातील विविध प्रकरणी केलेल्या रिट पिटीशन (क्रिमीनल) व एसएलपी (क्रिमीनल) मध्ये ॲड.श्री.बी.एच.मार्लापल्ली यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात कामकाज पाहिले आहे. याबाबत ॲड श्री. मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ यांनी रु.१,१०,०००/- प्रती सुनावणीप्रमाणे विविध प्रकरणात उपस्थित राहिलेल्या १४ सुनावण्याचे एकुण रु.१५,४०,०००/-(रु.१४,३०,०००/- + रु.१,१०,०००/-) इतके व्यावसायिक फीचे देयक, सरकारी वकील, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचेमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाज पाहिल्याबाबतची कागदपत्रं शासनास सादर केलेली आहेत.

तथापि, ॲड.श्री.बी.एच. मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ हे विधि व न्याय विभागाच्या क्र. एसयुपी-५३१३/(३२)/डी-१४,दिनांक १३.०२.२०१४ अधिसुचनेनुसार त्यांच्या ए-॥ पॅनेलवरील वकील आहेत. विधि व न्याय विभागाच्या दिनांक १५.०२.२०१४ च्या शासन निर्णयानुसार मा. सर्वोच्च न्यायालयातील ए-॥ पॅनेलवरील वकीलांना न्यायालयातील प्रत्येक उपस्थितीस रु.३५,०००/- इतकी फी अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन ॲड.श्री.बी.एच. मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ यांना मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाज पाहिल्याबाबत

रु.३५,०००/- प्रती सुनावणीप्रमाणे एकुण १४ सुनावणीसाठी उपस्थित राहिलेबाबत रु.४,९०,०००/- इतकी फी मंजूर करुन सदर फी अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. म्हणून संदर्भ १ वर उल्लेखित शासन निर्णय रद्द करुन खालील प्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

शासन निर्णय: -

अॅड.श्री.बी.एच. मार्लापल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने गृह विभाग, मंत्रालय (खुद्द) येथील विशा-३(अ) कार्यासनाकडील (१) सुभाष पोपटलाल दवे विरुध्द युनियन ऑफ इंडिया आणि इतर व (२) माया अजित साटम विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर, या मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणी खालील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकास मा.सर्वोच्च न्यायालयात कामकाज पाहिल्याबाबत रु.३५,०००/- (रुपये पस्तीस हजार फक्त) प्रती सुनावणीप्रमाणे एकुण १४ सुनावणीकरीता उपस्थित राहिल्याबद्दल (रु.३५,०००/- X १४) **रु.४,९०,०००/-(रुपये चार लाख नव्वद हजार फक्त)** इतकी फी मंजूर करुन सदर फी अदा करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	न्यायालयातील प्रकरणाचा तपशिल	न्यायालयातील उपस्थितीचा दिनांक	मागणी केलेली फी रुपये	प्रचलित दरानुसार शासकीय दराने अनुज्ञेय फी
१.	रिट पिटीशन (क्रिमी.) क्र.१३७/२०११, १३८/२०११, ३५/२०११ आणि एसएलपी(क्रिमी.) नं.२४४२/२०११, एसएलपी(क्रिमी.) नं.१९०९/२०११, एसएलपी(क्रिमी.) नं.१९३८/२०११, रिट पिटीशन (क्रिमी.) नं.२२०/२०११, रिट पिटीशन (क्रिमी.) २४९/२०११, सुभाष पोपटलाल दवे विरुध्द युनियन ऑफ इंडिया आणि इतर	२०.०३.२०१२ ३०.०४.२०१२ ०८.०५.२०१२ ११.०५.२०१२ ०७.०८.२०१२ ११.०९.२०१२ ३०.१०.२०१२ ०७.११.२०१२ २२.११.२०१२ २९.११.२०१२ ३१.०१.२०१३ ०३.०४.२०१३ ११.०४.२०१३	१,१०,०००/- X १३ = १४,३०,०००/-	**४,५५,०००/- (३५,०००/-X १३= ४,५५,०००/-)**

३.	एसएलपी (क्रिमी.) नं.६७१८/२०१२, माया अजित साटम विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर	१३.०३.२०१३	१,१०,०००/-	**३५,०००/-**
	एकुण देय फी रुपये		१५,४०,०००/-	**४,९०,०००/-**

(एकूण रुपये चार लाख नव्वद हजार फक्त)

याबाबतचा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय विधि व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०९/६९२/ क्रिमी.जन./कॉन./२०१६/अे-ब्रँच, दिनांक २४.१०.२०१६ अन्वये, तसेच, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र - २०१५/प्र.क्र.२१/२०१५/ विनियम, दिनांक २९ जुलै, २०१५ अन्वये, वित्तीय अधिकार नियम नियम पुस्तिका - १९७८, भाग-पहिला, उपविभाग - दोन मध्ये नव्याने समावेश केलेल्या अ.क्र.४९ नियम क्र.१६६-अ नुसार प्रदान केलेल्या अधिकारानुसार विधि व न्याय विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू रक्कम आहरीत करण्यास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१६१५०४५२०२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.03.16 15:07:19 +05'30'

(किशोर भालेराव)

उप सचिव (विधि),गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

आपणास विनंती करण्यात येते की, उक्त शासन निर्णयानुसार ॲड श्री. बी.एच. मार्लापल्ली यांना मंजूर करण्यात आलेली व्यावसायिक फी अदा करुन याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२. उप सचिव (विशा-३ अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
३. अवर सचिव (विशा-३अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२..
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ , मुंबई .
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. ॲड.श्री. बी.एच.मार्लापल्ली,डी-३१४, बेसमेंट, डिफेंन्स कॉलनी, नवी दिल्ली-११००२४.
८. विधी व न्याय विभाग (ए/ब्रँच), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (पोल-१०).